MHRG190001352023

:: विशेष दिवाणी दावा क्र.५६/२०२३ (जुना विशेष दिवाणी दावा क्र.६८/२०१९) मधील निशाणी क्र.१४० खालील आदेश ::

प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.६ ते ८ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६, नियम १७ प्रमाणे कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली.

०२. अर्ज व वादींनी अर्जास दिलेले म्हणणे निशाणी क्र.१४३ वाचले. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

०३. प्रतिवादींतर्फे विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, वादींनी प्रस्तुतचा दावा ठरावाकरिता व मनाई हुकूमाकरिता दाखल केला असुन सदर दाव्यास प्रतिवादी क्र.६ ते ८ यांनी दाखल केलेल्या कैफियतीमध्ये टंकलेखनाच्या चुकीमुळे काही ठिकाणी प्रतिवादीचे ठिकाणी वादी असा उल्लेख झाला असल्याचे कथन केले आहे. त्यानुसार कैफियतीतील परिच्छेद क्र.६ मधील ओळ क्र.९ मध्ये 'या प्रतिवादींनी दावा मिळकतीचा सर्च व टायटल रिपोर्ट घेतला असुन व वादी यांनी' या ओळीतील वादी ऐवजी प्रतिवादी क्र.१ ते ५ असे लिहिण्याची परवानगी मागितली आहे. तसेच कैफियतीतील परिच्छेद क्र.६ मधील ओळ क्र.१२ 'सदभावनेने केलेले आहे. तसेच वादी हेच दावा मिळकतीचे ऑस्टेंसिबल ओनर' या ओळीतील वादी ऐवजी प्रतिवादी क्र.१ ते ५ असे लिहिण्याची परवानगी मागितली आहे. वरील दुरुस्त करुन दावा चालविणे आवश्यक आहे. सदरच्या

दुरुस्तीने कैफियतीमध्ये कोणताही बदल होणार नाही याउटल सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे कामकाज गुणवत्तेवर चालवुन नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने निकालाकरिता मदत होणार असल्याने सदरची दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

०४. वादींतर्फे विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र.६ ते ८ यांनी वादीस त्रास देण्याच्या उद्देशाने विविध प्रकारचे खोटे व खोडसाळ अर्ज देतात. वादी यांनी कैफियतीच्या अनुषंगाने पुन्हा त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्यानंतर दावा उलटतपासाकरिता असताना प्रतिवादी क्र.६ ते ८ यांनी सदर दाव्यात मुद्दे रिकास्ट करण्याकरिता अर्ज दिला व त्यानंतर सदरचा अर्ज मागे घेतला. प्रतिवादी क्र.६ ते ८ यांनी वादी यांच्यासोबत तडजोडीची बोलणी सुरु असताना कैफियतीमधील परिच्छेद क्र.१२ मध्ये वादी हे दावा मिळकतीचे ऑस्टेन्सीबल ओनर असल्याचे कैफियतीव्दारे मान्य केले असुन तसे शपथपत्रदेखील दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.६ ते ८ यांना दावा मिळकतीची हाव सुटल्याचे कैफियत व शपथपत्र देऊन लेखी केलेली कथने फिरविण्याकरिता सदरचा कैफियत दुरुस्तीचा अर्ज दिला असुन अर्ज कायदेशीर नसल्याने फेटाळण्याची विनंती केली आहे.

०५. केस फाईलची पडताळणी केली. प्रस्तुतचा दावा ठरावाकरिता, खरेदीखते रद्द करुन मिळणेकरिता व मनाई हुकूमाकरिता दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीने पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असले तरी प्रतिवादीनी अदयाप उलटतपास घेतलेला नाही. दाव्याच्या सद्यस्थितीचे अवलोकन करता प्रतिवादींनी केलेल्या कैफियत दुरुस्तीमुळे कायदेशीर दुरुस्तीस बाधा येत नाही. सदरच्या दुरुस्तीने वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु

प्रतिवादींनी कैफियत दाखल करतेवेळी टंकलिखीत चुका करणे उचित नाही. अशा स्वरुपाच्या अर्जाने दाव्याच्या सुनावणीस विलंब झाला असुन प्रकरण न्यायप्रविष्ठ राहिलेले आहे. अर्जाचे व दाव्याचे एकुणच स्वरुप पाहता, प्रस्तावित दुरुस्ती रास्त आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होणार नसल्याचे प्रकर्षाने दिसुन येते. सदर कारणमीमांसा लक्षात घेता अर्ज कॉस्ट रक्कम रु.१०००/- आकारुन मंजूर होण्यास पात्र ठरतो. परिणामी खालील आदेश.

**:: आदेश ::**

१. प्रतिवादींचा कैफियत दुरुस्ती अर्ज निशाणी क्र.१४० खर्चाची रक्कम रुपये १०००/- वादींना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाची रक्कम रुपये १०००/- वादींना अदा केल्यानंतर प्रतिवादींनी मागणी केल्याप्रमाणे कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

३. प्रतिवादींनी विहीत मुदतीत कैफियतीमध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त कैफियत अभिलेखावर दाखल करण्याबाबत आदेशित करण्यात येते.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.01.20 10:28:52 +0530

महाड
दिनांकः१९.०१.२०२६

**(श्रीमती एच.आर.जाधव)**
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
महाड